आकर्षक
लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका
प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड
शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
—श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्—
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.५१ ■ मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

उत्कृष्ट क्वालिटी
दुकानात कामासाठी होतकरू
हुशार अनुभवी मुलगा
लावणे आहे. समक्ष भेटा
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर,
पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

नीटसह सर्वच परीक्षा आयोजनात उच्चस्तरीय समिती
एनटीएच्या परीक्षा प्रक्रियेत राज्याचा सहभाग वाढणार

मुंबई, दि. २३ : नीटसह राष्ट्रीय पातळीवरील विविध परीक्षांच्या आयोजनात पारदर्शकता, सुरक्षितता आणि विश्वासार्हता वाढविण्यासाठी राज्य शासनाचा सहभाग वाढविण्यात येणार आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) आयोजित परीक्षांच्या व्यवस्थापनासाठी राज्य शासन आणि केंद्रीय परीक्षा संस्थांमध्ये समन्वयाची प्रभावी यंत्रणा निर्माण करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उच्चस्तरीय कृतीदलाचे अध्यक्ष नंदन निलेकणी यांनी चर्चा केली. वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत उच्चस्तरीय कृतीदलाचे सदस्य डॉ. एस. सोमनाथ, शंकर मरुवाडा, राष्ट्रीय भरती संस्थेच्या (एनअ-इए) संचालक श्रुती सिंघल आदी उपस्थित होते.



एनटीएमार्फत आयोजित मोठ्या परीक्षांसाठी राज्यातील उपलब्ध पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर, प्रत्येक जिल्ह्यात परीक्षा केंद्रांची उपलब्धता, परीक्षा केंद्रांवरील मनुष्यबळाचे प्रशिक्षण आणि परीक्षेसाठी आवश्यक लॉजिस्टिक व्यवस्थापन या मुद्द्यांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय पातळीवरील परीक्षांचे आयोजन करताना केंद्र आणि राज्य सरकारमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. परीक्षा केंद्रांची उपलब्धता, केंद्रांवरील सुविधा, प्रशिक्षित कर्मचारी आणि सुरक्षित परीक्षा वातावरण निर्माण करण्यासाठी राज्य शासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. यासाठी उपलब्ध शासकीय यंत्रणा आणि पायाभूत सुविधांचा उपयोग करण्याबाबतही विचारविनिमय झाला. ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी समान संधी मिळावी, इंग्रजी भाषेची अडचण असलेल्या विद्यार्थ्यांना तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षा प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, यासाठी आवश्यक बदल करण्यावर भर देण्यात आला. परीक्षांमधील विश्वासार्हता कायम राखण्यासाठी गैरप्रकारांना आळा घालणारी सुरक्षित आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी परीक्षेच्या अधिक **(पान ४ वर)**

मा.मुख्यमंत्र्यांच्या शोरूममधून चोरट्यांनी तिजोरीच पळवली

नांदेड, दि. २३ : भाजपचे खासदार आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या मालकीच्या जया हुंडाई शोरूममध्ये चोरीची धक्कादायक घटना घडली आहे. रात्रीच्या सुमारास शोरूममध्ये घुसलेल्या दोन चोरट्यांनी चक्क तिजोरीच उचलून पळ काढल्याने शहरात खळबळ उडाली आहे. चोरीची संपूर्ण घटना शोरूममधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, फुटेजमध्ये दोन चोरटे दिसून आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या वेळी दोन चोरट्यांनी शोरूममध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी शोरूममधील तिजोरी उचलून घटनास्थळावरून पलायन केले. सकाळी शोरूम प्रशासनाच्या निदर्शनास चोरीचा प्रकार आल्यानंतर तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक **(पान ४ वर)**

लाडकी बहीण योजनेमुळे तिजोरीवर ताण
अन्न-औषध मंत्री नरहरी झिरवाळांची कबुली



नांदेड, दि. २३ : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे राज्याच्या आर्थिक स्थितीवर मोठा ताण आला आहे. या योजनेपासून सरकारला मागे हटता येणार नाही, अशी कबुली अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. नांदेड जिल्ह्यातील लोहा येथे आयोजित जाहीर कार्यक्रमात ते बोलत होते.

निवडणुकीपूर्वी कोणीही सांगितले नसताना महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. आता या योजनेच्या लाभार्थी बहिणींची संख्या मोठी असल्याने त्यांच्यापासून दूर जाता येणार नाही. योजनेमुळे राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर ताण निर्माण झाला असून, सरकारला यातून मार्ग काढावा लागेल, असे झिरवाळ यांनी स्पष्ट केले. राज्यात संभाव्य दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने आर्थिक संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. पाण्याचे संकट गडद झाल्यास पिण्याचे पाणी रेल्वे किंवा विमानाने पोहोचवण्यासारख्या उपाययोजना कराव्या लागू शकतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च होईल. मात्र, दुष्काळाचा सामना करण्यासाठी सरकार निधीची कमतरता पडू देणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना झिरवाळ म्हणाले की, निवडणुकीपूर्वी आम्हाला कोणीही या योजनेबाबत सांगितले नव्हते. मात्र, महायुती सरकारने ही योजना सुरू केली. आता योजनेतून लाभ घेणाऱ्या लाडक्या **(पान ४ वर)**

शहरात अठ्ठावीस ई-बसेस धावणार
म.न.पा.च्या विशेष महासभेत मंजुरी



धुळे, दि.२३- प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेंतर्गत शहर बस सेवेच्या व्यवस्थापनासाठी धुळे महानगरपालिकेच्या संपूर्ण मालगीची धुळे महानगर परिवाहन सेवा उपक्रम ही विशेष उद्देश कंपनीच्या स्थापनेचा विषय महासभेसमोर ठेवण्यात आला. या विषयावर विरोधकांसह चर्चा होवून सर्वानुमते मंजूर करण्यात आले. शहराच्या विविध भागांतून एकुण २८ ई-बसेस पुढील वर्षापासून धावणार आहेत. त्यासाठी पुर्व तयारीला वेग आल्याची माहिती उपमहापौर ज्योत्सना पाटील यांनी विशेश महासभेत दिली.

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यात आलेल्या विशेष महासभेला महापौर तब्यत बरी नसल्याने उपस्थित राहू न शकल्याने उपमहापौर ज्योत्सना पाटील यांनी कार्यभार सांभाळला. यावेळी आयुक्त नितीन कापडणीस, नगरसचिव मनोज वाघ यांच्यासह नगरसेवक व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. उपमहापौर ज्योत्सना पाटील यांनी महासभेत स्पष्ट केले की, पंतप्रधान मोदी यांनी पंतप्रधान ई-बस सेवा योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी एक हजार तीनशे नव्वद ई-बसेस दिल्या असून धुळे शहरासाठी **(पान ४ वर)**



कार्तिक स्वामी मंदिर दर्शनासाठी खुले राहणार

धुळे, दि.२३- चाळीसगाव रोडवरील बिजेराम देडराज ऑइल मिल्स कंपाउंडच्या आवारातील श्री कार्तिक स्वामींचे प्राचीन खासगी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी कार्तिक पौर्णिमेनिमित्त आज दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी दिवसभर खुले राहणार आहे.

जुन्या पिढीतील या मंदिरात दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला भाविकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे **(पान ४ वर)**

नेवाडे येथे रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

शिंदखेडा ता.च्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, सिंचन आणि शेतीला प्राधान्य-पालकमंत्री ना.जयकुमार रावल

धुळे, दि. २३- शिंदखेडा तालुक्यातील ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी रस्ते, सिंचन, पिण्याचे पाणी, शेती आणि रोजगारनिर्मितीच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. विशेषतः शेतकऱ्यांना आपला शेतीमाल शेतातून थेट मुख्य रस्त्यापर्यंत आणि बाजारपेठेत सहज पोहोचवता यावा, यासाठी ग्रामीण व पाणंद रस्त्यांचे जाळे मजबूत करण्यात येत आहे. मंजूर विकासकामे दर्जेदार आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यावर भर असल्याचे



राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

शिंदखेडा तालुक्यातील नेवाडे येथे रस्त्याच्या कामाच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, **(पान ४ वर)**

मुलीला वाचवण्यासाठी विहिरीत उतरलेल्या बापाचा दुर्दैवी मृत्यू

पिंपळनेर,दि.२३(प्रतिनिधी)- विहिरीतून पाणी काढताना पाय घसरून पडलेल्या १६ वर्षीय मुलीला वाचवण्यासाठी विहरीत उतरलेल्या बापाचाही मृत्यू झाला आहे. साक्री तालुक्यात घडलेल्या या दुर्दैवी घटनेने परिसरात शोक व्यक्त होत आहे.

तालुक्यातील कुचीविहीर पोस्ट पिंपळगाव बुद्रुक गावातील सुशीला पोपट गावित ही मुलगी सकाळी ९ वाजेच्या सुमारास बैलांना पाणी पाजण्यासाठी एका शेतातील विहिरीतून बादलीने पाणी काढत होती. यावेळी तिचा पाय घसरून ती विहिरीत पडली. मुलगी पाण्यात **(पान ४ वर)**

संजय शर्माना पाच डिसेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडी

धुळे, दि.२३- सोशल मीडियावरील वादग्रस्त टिपण्यांमुळे अटकेत असलेले संजय शर्मा यांना आज न्यायालयाने पाच डिसेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की, वादग्रस्त सोशल मीडियावरील विधानामुळे संजय शर्मा यांचे विरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. ॲस्ट्रॉसिटीच्या गुन्ह्यात त्यांना पोलिसांनी अटक करून न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती.यावेळी न्यायालयाच्या आवारामध्ये पोलिसांसमक्ष शिवीगाळचे प्रकार झाले होते. आज मात्र न्यायालयात कोणीही आले नव्हते.

जिल्हा न्यायाधीश वर्ग दोन,न्यायमूर्ती श्री.पी व्ही बुलबुले साहेब यांच्या कोर्टात संजय शर्मा यांना दाखल करण्यात आले होते.त्यांच्या वतीने ॲड. राहुल पाटील यांनी काम पाहिले. न्यायालयाने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यावर संजय शर्मा यांना पाच डिसेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. यानंतर शर्मा यांच्याकडून जामीनावर मुक्त करण्याचा अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.

नवापूरला नगरोत्थान योजनेंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण कामाला राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी केला शुभारंभ

नवापूर, दि.२३ (प्रतिनिधी)- नवापूर शहराच्या विकासकामांना गती देत नगरपालिकेच्या नगरोत्थान योजनेंतर्गत महात्मा गांधी पुतळा ते डायमंड हॉटेलपर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते भरतभाऊ गावित, नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून कामाचा शुभारंभ करण्यात आला. या



रस्त्याच्या कामासाठी . लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते भरतभाऊ गावित, नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे, पाणीपुरवठा सभापती शरद पाटील, आरोग्य सभापती मिनल लोहार,बांधकाम सभापती भालचंद्र गावीत,महिला बालकल्यान सभापती सुर्ययाबी शहा, **(पान ४ वर)**

व्यावसायिकावर प्राणघातक हल्ला

धुळे, दि.२३- येथील जमनागिरी रोड परिसरातील एका व्यावसायिकावर पूर्ववैमनस्यातून हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकरणी चार जणांविरुद्ध धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

प्रसाद प्रफुल्ल चंद्रजोशी (रा. अशोक नगर, चितोड रोड, धुळे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित भय्या पाटील, सुनिल पाटील, जित भय्या पाटील, यांच्यासह अन्य एका विरुद्ध (सर्व रा. नारायण मास्तर चाळ, चितोड रोड धुळे) धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. संशयितांनी रविवारी (ता.२२) दुपारी बाराच्या सुमारास अशोकनगर **(पान ४ वर)**

सोनगीर येथील प्राचीन सोमेश्वर मंदिरात यात्रोत्सवाचे आयोजन

सोनगीर दि.२३ (प्रतिनिधी) **येथील ऐतिहासिक, प्राचीन श्री. सोमेश्वर महादेव मंदिरात आज(दि. २४)रोजी कार्तिकी पौर्णिमेनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने सोमवार मध्यरात्री दीप उत्सव, हरिहर भेट आदी उत्सव पार पडले असून मंगळवार दि. २४ नोव्हेंबर रोजी मुख्य यात्रोत्सव साजरा होत आहे .**

उत्सवानिमित्त सकाळी लघुरुद्राभिषेक, पूजन, महाआरती होईल आणि त्यानंतर दुपारी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याबद्दलची माहिती पुजारी गुलाब गोसावी, आबा महाराज, आणि दीपक गोसावी यांनी दिली. यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिराची रंगरंगोटी, विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. श्री. सोमेश्वर महादेव मंदिर हे अतिशय प्राचीन देवस्थान आहे. पेशवे काळात इंदूरच्या महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी सन १७६५ ते १७७० या दरम्यान या मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. तसेच मंदिराच्या दिवाबत्ती व देखभाल दुरुस्तीसाठी किल्ल्या वरील किल्लेदाराकडून वार्षिक खर्च केला जात असल्याचे नोंदी पुणे येथील पेशवे दप्तरात आहेत.मंदिराची रचना घुमटावर आधारित असून त्यावर एकूण बारा घुमट आहेत. हे बांधकाम चुना आणि चिपट विटांच्या साहाय्याने करण्यात आले आहे. भाविकांची अशी श्रद्धा आहे की, मंदिरातील महादेवाची पिंड स्वयंभू आहे. सोमेश्वर मंदिर हे जागरूक देवस्थान म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. या मंदिरात वर्षभर विवाह केले जातात. येथे विवाह करताना तिथी किंवा मुहूर्त पाहण्याची गरज नाही, अशी मोठी मान्यता असल्याने वर्षभर विवाह सोहळे संपन्न होतात. येथील गाडी लोहार समाजाला कार्तिकी पौर्णिमेच्या आदल्या दिवशी मंदिरावर भगवा ध्वज लावण्याचा तसेच धनगर समाजाला कार्तिकी पौर्णिमेच्या दिवशी रात्री मंदिरावर मातीचे दिवे लावून रोषणाई करण्याचा मान परंपरेने मिळाला आहे. मंदिराच्या अस्तित्वापासून हा मान पाळला जात आहे.कार्तिकी पौर्णिमेच्या यात्रोत्सवानिमित्त मंदिराजवळ मनोरंजनाची साधने, खाद्यपदार्थांचे स्टॉल, ज्वेलरी (दागिने), सौंदर्य प्रसाधनांची दुकाने आणि संसारोपयोगी साहित्याची दुकाने मोठ्या **(पान २ वर)**

भटक्या कुत्र्यांचा हल्ला

सात वर्षीय चिमुकला गंभीर जखमी
जयचंद नगरात भीतीचे वातावरण

नंदुरबार, दि.२३ (प्रतिनिधी)- शहरातील जयचंद नगर परिसरात भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने ७ वर्षीय चिमुकल्यावर हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात चिमुकला गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

शिवांश सोनी (वय ७, रा. जयचंद नगर, नंदुरबार) हा आपल्या मित्रांसोबत कॉलनीमध्ये खेळत असताना अचानक भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने त्याच्यावर झडप घातली. कुत्र्यांनी त्याच्या चेहऱ्यावर आणि तोंडावर जबर चावे घेतले. त्यामुळे तो रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळला. आरडाओरडा ऐकून परिसरातील नागरिक धावून आले आणि त्यांनी कुत्र्यांना पळवून लावत शिवांशला तातडीने रुग्णालयात दाखल केले. त्याच्या चेहऱ्यावरील जखमा गंभीर असून त्याच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे सोनी कुटुंबासह संपूर्ण परिसरात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

नागरिकांमध्ये संताप

नंदुरबार शहरात गेल्या काही दिवसांपासून रस्त्यांवर, कॉलन्यांमध्ये आणि लहान मुले खेळतात त्या ठिकाणी भटक्या कुत्र्यांच्या झुंडी फिरत असल्याने नागरिकांमध्ये **(पान २ वर)**

कारागृह अधीक्षकांचे हृदयविकाराने निधन



धुळे, दि.२३- धुळे जिल्हा कारागृहाचे अधीक्षक एकनाथ गोबा शिंदे (वय ५८) यांचे आज संध्याकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

शिंदे हे दुपारी भोजन करून घरी थांबले होते. त्यावेळी त्यांना काहीशी अस्वस्थता जाणवली. परंतू काही काळ आराम केल्यानंतर परिस्थिती पूर्ववत होईल असे त्यांना वाटले. त्या अनुषंगाने त्यांनी कुटूंबियांशी चर्चा केल्यानंतर ते काही काळ झोपले. संध्याकाळी सातच्या सुमारास कुटूंबियांशी चर्चा करतांना त्यांना हृदयविकाराचा **(पान २ वर)**

राजस्थानातील नऊ अपघातग्रस्तांचा अमराळे येथे रात्री दफनविधी संपन्न

धुळे, दि.२३- शिंदखेडा तालुक्यातील अमराळे येथील नऊ जणांचा राजस्थान मधील कोट्या जवळ झालेल्या भीषण अपघातात रविवारी पहाटे झाला. सर्वांचा दफन विधी अमराळे येथे रविवारी रात्री एक वाजता शोकाकुल वातावरणात पार पडला. पालकमंत्री जयकुमार रावल यावेळी स्वतः उपस्थित होते.

कोटा येथील भीषण अपघातातील नऊ जणांचे मृतदेह रविवारी रात्री बाराला अमराळे येथे पोहोचले. गावकऱ्यांनी त्यांच्या दफन विधीसाठी जेसीबीच्या साह्याने खड्डा केला. रात्री एक वाजता विधिवतपणे सर्व मृतदेहांचे दफन करण्यात आले. पालकमंत्री जयकुमार रावल, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोसावी, तहसीलदार देवरे यांच्यासह राजकीय पदाधिकारी उपस्थित होते. अमराळे परिसरातील दराणे, रोहणे, तमथारे ,आरावे, जखाणे गावातील नागरिक भावना व्यक्त करण्यासाठी रात्री उशिरापर्यंत होते. पालकमंत्री जयकुमार रावल यांनी घरी राहिलेल्या दहा वर्षाच्या मुलाला भविष्यात आपण काही कमी पडू देणार नाही ,अडचणी आल्यास मला सांगा असे म्हणत जबाबदारी स्वीकारली.

महापौरांना रुग्णालयातून सकाळी डिस्चार्ज दिला

धुळे, दि.२३- महापौर मायादेवी परदेशी यांना आज सकाळी विघ्नहर्ता हॉस्पिटल मधून डिस्चार्ज देण्यात आला आहे. झोपेच्या गोळ्या घेतल्याने त्यांना विघ्नहर्ता रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना ४८ तास वैद्यकीय देखरेखीखाली ठेवले होते. आज सकाळी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे.

लोकशाही मूल्ये व सामाजिक जबाबदारी रुजविण्यावर भर देण्यासाठी एक दिवसीय विशेष शिक्षक प्रशिक्षण



शिरपूर, दि.२३- अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशन व सीएमसीए चा संयुक्त उपक्रम राबविण्यात येऊन विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये व सामाजिक जबाबदारी रुजविण्यावर भर देण्यात आला.

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणे पुरेसे नसून, त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव, नागरिकत्वाची भावना, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये रुजविणे अत्यंत आवश्यक झाले आहे. भविष्यातील जबाबदार, जागरूक आणि सक्रिय नागरिक घडविण्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने याच उद्देशाने चिल्ड्रन्स मूव्हमेंट फॉर सिविक अवेअरनेस (सीएमसीए) आणि अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिरपूर येथे एक दिवसीय विशेष शिक्षक प्रशिक्षण सत्राचे यशस्वी ऑनलाइन आयोजन करण्यात आले. अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशनच्या संचालिका द्रेता पटेल **(पान २ वर)**

१८ वा स्मृती दिवस





डॉ.पूर्णिमा संदीप साळवे चि.परी संदीप साळवे
(मृत्यू दिनांक २४ नोव्हेंबर २००८)
शोकाकुल-खैरनार-साळवे परिवार
दलितमित्र ज्योत्स्नाताई खैरनार माता (धुळे)
संदीप मधुकर साळवे (पती (पुणे)) चि.सिध्दार्थ साळवे (पुत्र (पुणे))
डॉ.सौ.सुषमा जगदीश पाखरे (भगिनी (धुळे)) डॉ.सौ.शुभदा राहुल खैरे (भगिनी (लंडन यु.के.))
वंदनाराणी खैरनार (भगिनी (धुळे)) सौ.प्रिया फर्रनांडीस (भगिनी (दुबई))
डॉ.चि.किमया जगदीश पाखरे (भाची (धुळे)) शमा खैरनार (भाची)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,15,950 रु.+3% GST
सोने- 24 K -1,26,000 रु.+3% GST
चांदी- 1,58,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

१६ वा स्मृतीदिन



स्व. सौ. प्रमिलादेवी सुभाष अग्रवाल
सरले जिवन विरले दर्शन उरल्या केवळ स्मृती
व्याकुळ नेत्र आज आपणास श्रद्धांजली अर्पिती
शोकाकुल
सुभाष रुपचंद अग्रवाल आशिष सुभाष अग्रवाल
चि.हर्षल, कु.परीधी. सौ. लिना आशिष अग्रवाल
एवम् समस्त आरावावाला परिवार, धुळे.
फर्म-आशिष एजंसीज, बारा पत्थर चौक, धुळे.
मे.आशिष अग्रवाल ॲण्ड असोसिएटस्
(चार्टर्ड इंजिनियर व गव्ह. रजि. व्हॅल्युअर)
मे.मंगलप्रभा डेव्हलपर्स- बिल्डर्स * कॉन्ट्रॅक्टर्स
पत्ता : अ २०२, दुसरा मजला वेंकटेश ड्रीम हब, मालेगाव रोड, धुळे

आपला महाराष्ट्र

ना, निरापद कोई नही है, ना तुम, ना मै, ना वे..!

अलीकडच्या काही वर्षांपासून धुळे शहरात चर्चेचे विषय कुठले असावे याला काही धर बंद नाही. सतत नकारात्मक मानसिकता आणि नकारात्मक चर्चा येथे सुरू असतात. त्यामुळे या शहरात चांगले काही घडेल अशी शक्यता विवेकवादी तसेच उच्च मध्यमवर्गीय बुद्धिवंतांना वाटत नाही. परिणामी ते नाशिक, पुणे मुंबई चा रस्ता धरतात तिकडेच स्थायी होतात. आपल्या जिल्ह्यात काय चाललेले आहे या संबंधीच्या हालचाली त्यांना कळतात. कधी कधी ते सोशल मीडियावर व्यक्तही होत असतात. पण अंतर राखूनच असतात ही वस्तुस्थिती आहे. मुळात या शहरात कधीच विभाजनवादी भूमिका नव्हती. ती काही वर्षांपासून प्रस्थापित करण्यात आलेली आहे. समाजातील विविध घटक आता आपला धर्म, आपली जात, आपली बिरादरी याच दृष्टिकोनातून स्वतःच्या आणि शहराच्या विकासाकडे बघतात. अर्थातच हा अतिशय संकुचित दृष्टिकोन असल्यामुळे आपले शहर पुढे जाऊ शकलेले नाही. महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये अशा प्रकारची विभाजनवादी भूमिका समाजा समाजात तयार करण्यात आलेली आहे. अनेक देशांमध्ये धर्म आणि राजकारण हे दोन्ही हातात हात घालून चालतात. त्या त्या देशात सरकार अस्तित्वात असले तरी धर्म मार्तंड जी भूमिका घेतील किंवा जे मत व्यक्त करतील त्यानुसार तिथला कारभार चालतो. परंतु अशा प्रकारचे धर्माधिष्ठित राजकारण लवकरच संपुष्टात आले आणि पुन्हा देशीवादाच्या नावाखाली प्रस्थापित झाले असे चढ उतार जगभर सुरू आहेत. आपल्या देशात जाणीवपूर्वक संवैधानिक लोकशाही देशीवादाच्या दिशेने कशी जाईल असे प्रयतक होत आहेत. त्याचे पाझर खालपर्यंत आलेले आहेत. त्यातून धुळे शहर देखील सुटलेले नाही. ज्या शहरात धर्म ही संकल्पना कधीच दैनंदिन समाज जीवनाच्या आड आली नाही तिथे आता कोण किती धर्मांध याचे हिशोब होत असतात.

एकमेकांचे राजकीय उट्टे काढण्यासाठी दोन्ही धर्मातील ठेकेदार नेहमीच्या पद्धतीने अतिउत्साहींना अफुची गोळी देत आले .ती त्यांनी चघळली आणि एकमेकांच्या विरूध्द उभे ठाकले. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी असा एक अभंग आहे. परंतु त्याच्या उलट जर बीजच विषारी पेरले जात असेल तर वृक्ष देखील विषारी उगवतो मोठा होतो आणि त्याला फळेही विषारीच लागतात. त्याला आपण बोली भाषेत विषवृक्षाची फळे म्हणतो. तसे बीजारोपण या शहरात झालेले आहे. ते बीज नष्ट करावयाचे असेल तर संविधानाशिवाय दुसरा पर्याय नाही. येत्या २६ तारखेला संविधान दिवस आहे. या दिवशी शहरातील प्रत्येकाने असा संकल्प केला पाहिजे की, मी आधी भारतीय आहे. नंतर मराठी वगैरे आहे, नंतर कुठल्या धर्माचा आहे, त्यानंतर जातीचा आहे किंवा जमातीचा आहे. जो आपला धर्म भारतीय आहे असे सांगत असेल. माझी जात भारतीय आहे असे सांगत असेल तर तो खरा देशप्रेमी होय असे संविधान सांगते. कारण संविधान हे जात आणि धर्मनिरपेक्ष आहे. ते मोडून तोडून टाकण्याची कृती आणि परिभाषा आजच्या राजकीय व्यवस्थेत वापरली जाते आहे. त्यातून जे निर्माण होणार आहे त्याला अराजक म्हणतात. एरव्ही आता कोणीही अराजक हटाव संविधान बचाव असे रस्त्यावर उतरून ओरडत असेल तर हा सगळ्यात मोठा विनोद आहे असे म्हणता येईल.जे संविधानाची भाषा बोलतात आणि तशी कृती करतात त्यांना देशद्रोही ठरविले जाते हा सुद्धा मोठाच विनोद म्हणावा लागेल. अशीच जर कृती असेल तर कितीही औद्योगिक वसाहती उभारा इथे सगळी ओसाड गावची पाटीलकीच दिसणार आहे. अशा वातावरणात कुणीही शहराच्या सर्वांगीण विकासाच्या बाता करू नयेत. एका धर्माचे लोक आपल्या आणि आपल्यावर अवलंबून असलेल्या बांधवांचा निर्वाह व्हावा म्हणून अव्याहत पावरलूम चालवितात त्यांनीच खऱ्या अर्थाने येथील औद्योगिक चक्र सुरू ठेवलेले आहे. या जिल्ह्याची अर्ध्याहून अधिक अर्थव्यवस्था या उद्योगामुळे आहे याचा विसर कोणालाही पडता कामा नये.

तसे तर अल्पसंख्यांक समाजाचे अनेक नेते राष्ट्रीय पातळीवर होऊन गेले. राज्य पातळीवर येऊन गेले आणि विभागीय पातळीवर, जिल्हा पातळीवर देखील होऊन गेले. त्यांनी या मातीवर प्रेम केले. कारण त्यांच्या येथील वास्तव्याचा हजार वर्षांचा इतिहास आहे. त्याच्याशी त्यांनी प्रतारणा केलेली नाही ही वस्तुस्थिती असून ती कोणीही खोडून काढू शकत नाही. स्वातंत्र्यसंग्रामात या समूहातील अनेकांनी आपले प्राण न्यौछावर केलेले आहेत. शेवटचा बादशहा बहादूर शाह जफर यास जी किंमत या देशासाठी मोजावी लागली त्याचे मूल्य करता येणार नाही. त्यास या देशातील बहुसंख्यंक राजांनी आपला नेता बनविले.अशी अनेक उदाहरणे देता येतील. या ठिकाणी तो विषय चर्चेचा नाही. उदाहरण म्हणून ठीक आहे. मुद्दा असा आहे की, अतिशय पुरोगामी म्हणून या शहराची ओळख महाराष्ट्रभर होती. अनेक विधायक चळवळीत असलेले महाराष्ट्रातील विविध विचारवंत धुळ्याचे नाव पुरोगामी चळवळीच्या संदर्भात आवर्जून घेत असत. मात्र आता धुळे म्हटले की बाहेरचे लोक नाके मुरळतात. ही अवस्था का निर्माण झाली यावरचा विचार जे काही विवेकवादी शिल्लक लोक इथे राहिलेले आहेत त्यांनी केला पाहिजे. जे काँग्रेसमध्ये होते ते मध्यम मार्गी पुरोगामी म्हणून ओळखले जात होते. त्यांनी आपल्या सोयीसाठी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली आणि धर्माधिष्ठित राजकारणाचा मार्ग पत्करला. त्या सर्वांना या शहराची प्रकृती माहिती आहे. मात्र ते कधीच यावर तोंड उघडणार नाहीत कारण त्यांची सतरंजी अडकलेली आहे. एक काळ असा होता की, डाव्या चळवळीतले फारसे लोक इथे नव्हते. कामगारांच्या युनियन जरूर होत्या. जे काही उद्योग या शहरात असतील त्यांना नख लावण्याचा कधी प्रयतक त्यांनी केलेला नाही. थोडक्यात औद्योगिक शांतता नांदत होती. नगरपालिकेत किंवा अन्य संस्थांमध्ये सर्व धर्माचे प्रतिनिधी गुण्या गोविंदाने काम करीत असत. अशा वातावरणात डॉक्टर रा.भ. चौधरी निवडून आले होते. ते नगराध्यक्ष देखील होते. त्यांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी त्या काळात एक कोटी रुपये नगरपालिकेच्या अकाउंट मध्ये बचत ठेवले होते. त्यांच्याकडे अनेक योजना होत्या. या शहरातील भुयारी गटार योजना आणि सिमेंट रस्ते आजही त्यांच्या दूरदृष्टीची ओळख देतात. ते जेव्हा पायउतार झाले तेव्हा नगरपालिकेतून खाली उतरले आणि पायी चालत घरी गेले. पण त्यांनी पालिकेचे वाहन वापरले नाही असा नैतिक दबदबा त्यावेळच्या लोकांचा होता. तसे नगरसेवकही होते. अपवाद म्हणूनच एखादा घुटण्यातला असेल पण बाकीचे सगळे विचारी होते त्यांनी सम सामायिक निर्णय घेऊन या शहराचा कारभार केला.

काँग्रेसचे अनेक उमेदवार सहजी इथे निवडून येत असत. त्यांना कधी कुठल्या धर्माचा आधार घ्यावा लागला नाही की जातीचा आधार घ्यावा लागला नाही ही वस्तुस्थिती आहे. ते दिवस आता इतिहास जमा झाले आहेत. आता रस्त्यांविषयी, पाणीपुरवठ्यांविषयी, लोकांच्या आरोग्याविषयी, स्वच्छते विषयी, अतिक्रमण मुक्त शहराविषयी, उपद्रवकारी शक्तीं विषयी, हप्ते वसुली विषयी, सार्वजनिक कामाच्या गुणवत्तेविषयी, आणि व्यक्तिगत नैतिकते विषयी इथे चर्चा होत नाही. दिल्लीत बसलेल्यांनी करोडो ने राज्याच्या नगरपंचायतीत, नगरपालिकेत आणि महापालिकेत निवडणुकीच्या काळात खोऱ्याने पैसे ओढले जातील इतके पाठवावेत आणि ह्या संस्था आपल्या कब्जात घ्याव्यात. कोणाला आपण लोकप्रतिनिधी बनवतो यासंबंधीचे कुठलेही तारतम्य न बाळगता फक्त आपले संख्याबळ तेवढे बघावे अशी नवी स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकशाहीवादी पद्धत आजच्या व्यवस्थेने तयार केलेली आहे. त्यांच्या संकल्पनेला साजेसेच म्होरके त्यांनी निवडून आणते आणि आज सर्व काही आलबेल असल्याच्या अविर्भावात ते वावरत आहेत. नागरिक या सगळ्या प्रक्रियेकडे नुसते बघत आहेत. कारण त्यांनी आपल्या हातात काहीच ठेवलेले नाही. परचेस होणे एवढेच त्यांच्या हातात आहे. त्यासाठी पाच वर्षाच्या कालावधीची ते वाट बघत असतात असे म्हणणे भाग आहे. सर्वच असे आहेत असे नाही. या प्रवृत्तीस भरपूर अपवाद आहेत पण ते बाहेर पडत नाहीत. म्हणूनच हे शहर अस्वस्थ करणाऱ्यांचे फावले आहे. जेव्हा आपण निर्माण केलेले स्वकीयच आपले शत्रू बनतात तेव्हा काय होते या परिस्थितीचे प्रत्यंतर सध्या आपले शहर घेत आहे. परंतु मांजराच्या गळ्यात घंटी कोणी बांधावी या चिंतेत सगळे आहेत. दुसरीकडे चोरट्यांनी शहरात उच्छाद मांडला. जर तिसऱ्या दिवशी कोणाचे तरी घर लुटल्याचे, कुणाच्यातरी गळ्यातील सोनपोत ओरबाडून पोबारा केल्याचे वृत्त झळकत असते. हा सिलसिला सतत चालू असतो. कोणाचा कुणाला मेळ नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते. कोण कुठल्या पक्षाचा, कुठल्या गटाचा, कुठल्या समूहाचा, कुठल्या धर्माचा, कुठल्या पंथाचा हा मुद्दा इथे गैर लागू असून प्रत्येकाला आपल्या आत मध्ये डुंकून स्वतःला तपासण्याची गरज आहे. कारण या व्यवस्थेतील प्रत्येक जणाचा वाटा अश्वस्थेत आहेच. भवानी प्रसाद मिश्र यांची एक सुंदर कविता या निमित्ताने आठवते. ते म्हणतात,ना निरापद कोई नहीं है,न तुम,न मै,न वे ! सबके पिछे बंधी है दूम आसक्तीकी,आसक्ती के आनन्द का छंद ऐसाही है–इसकी दुम पर पैसा है.! कोई है कोई है,जितकी जिन्दगी दूधकी धोई है.ना ! दूध किसीका धोबी नहीं है,हो तो भी नही है.या कवितेत आपण स्वतःला डोकाऊन बघू शकतो. एवढे केले तरी शहराची गाडी रूळावर येईल.

हृदया महाजनला बॅडमिंटन स्पर्धेत दुहेरी मुकुट, १३५ खेळाडू सहभागी



धुळे, दि.२३- महाराष्ट्र बॅडमिंटन संघटना आणि धुळे शहर व तालुका बॅडमिंटन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने, कै. उत्कर्ष रवंदळे यांच्या स्मरणार्थ आयोजित मधुळे खुली बॅडमिंटन स्पर्धाफ रविवारी जिल्हा क्रीडा संकुल येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत धुळे, जळगाव, जामनेर, भुसावळ, चाळीसगाव, मालेगाव, नंदुरबार, दोंडाईचा, साक्री व अमळनेर येथील एकूण १३५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत १५ आणि १७ वर्षांखालील मुलींच्या दोन्ही गटांत विजेतेपद पटकावून धुळ्याच्या हृदया महाजन हिने दुहेरी मुकुट मिळवला.

बक्षीस वितरण समारंभास संघटनेचे सचिव डी. व्ही. पाटील, योगेश पाटील, अभिजीत पाटील, प्रशांत भामरे, निनाद शिंदे व डॉ. आशिष पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रा. अभिजीत पाटील यांनी विद्यार्थ्यांनी भ्रमणध्वनीपेक्षा मैदानी खेळांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डी. व्ही. पाटील यांनी केले.

या स्पर्धेत विजेते आणि उपविजेत्यांमध्ये ९ वर्षांखालील मुले हेरंब भदाणे (धुळे), रुद्र पाटील (धुळे), ९ वर्षांखालील मुली : यज्ञा नेरकर (चाळीसगाव), विधी कलंत्री (मालेगाव), ११ वर्षांखालील मुले : फरदीन पठाण (भुसावळ), देवांशू तुमरम (भुसावळ), ११ वर्षांखालील मुली : भूमी वाघ (धुळे), यज्ञा नेरकर (चाळीसगाव), १३ वर्षांखालील मुले : आदित्य सोनार (धुळे), चैतन्यमय शुक्ला (धुळे), १३ वर्षांखालील मुली : ऐश्वर्या गायकवाड (मालेगाव), ज्ञानेश्वरी पवार (दोंडाईचा) १५ वर्षांखालील मुले : केशव काकणी (मालेगाव), प्रथमेश पाटील (शिरपूर) १५ वर्षांखालील मुली : हृदया महाजन (धुळे), कस्तुरी पाटील (धुळे) १५ वर्षांखालील दुहेरी मुले : अर्णव पहाडे / केशव काकणी (मालेगाव), दक्ष अग्रवाल / प्रथमेश पाटील (शिरपूर) १५ वर्षांखालील दुहेरी मुली : श्रावणी शहा / वेदिका मसल (धुळे), लिखिता ठाकूर / ज्ञानेश्वरी पवार (धुळे) १७ वर्षांखालील मुले : नैतिक शिंदे (जामनेर), अथर्व रवंदळे (धुळे) १७ वर्षांखालील मुली : हृदया महाजन (धुळे), लिखिता ठाकूर (धुळे) १९ वर्षांखालील मुले : मितेश पवार (शिरपूर), सिद्धेश पवार (दोंडाईचा)

स्पर्धेसाठी मुख्य पंच म्हणून रोशन लोहार, तर पंच म्हणून गौरव कुमार, दीपा खैरनार, वैदेही पाटीदार, रुद्र बाविस्कर, चैतन्य सावंत, उर्वी शिंदे व राज परदेशी यांनी काम पाहिले. सर्व विजेत्यांचे संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आ. कुणाल पाटील, उपाध्यक्ष डॉ. एस. टी. पाटील, कार्यकारी अध्यक्ष प्रकाश भास्करराव पाटील, मानद सचिव डी. व्ही. पाटील, योगेश पाटील, उमेश पटेल, महेश भोई, भटू सिंग गिरासे, बी. बी. मासूळ, प्रशांत भामरे व धनंजय सोनवणे यांनी अभिनंदन केले आहे.

नोकरीचे आमिष दाखवून तरुणांना फसवणारा जेरबद

धुळे, दि.२३- धुळे जिल्ह्यातील तरुणांची नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या संशयितास साक्री पोलिसांच्या पथकाने आज येथील जिल्हा न्यायालयाजवळ पकडले. त्याला ताब्यात घेत अटक केली.

पोलीस उपअधीक्षक ओंकार गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उपनिरीक्षक वसंत पाटील यांच्यासह पोलिस पथकाने कारवाई केली. वैभव विजय पोळ (रा. अलिबाग) असे त्याचे नाव आहे. साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा (२०२५) दाखल असून या प्रकरणी पोलीस त्याच्या मागावर होते. त्याचबरोबर धुळे जिल्ह्यातही विविध पोलीस ठाण्यात वैभव पोळ याच्या विरुद्ध फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. नोकरीचे आमिष दाखवून तरुणांकडून लाखो रुपये त्यांनी उकळले असून चौकशीअंती दिली त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. याच प्रकरणी साक्री पोलिसही संशयित वैभव पोळ याचा शोध घेत होते. वैभव पोळ याच्यासह त्याच्या साथीदारांनी येथील २०० पेक्षा अधिक तरुणांना गंडा घातल्याचा आरोप आहे. या संदर्भातील न्यायालयीन कामकाजासाठी वैभव पोळ आज धुळ्यात आला होता. या संदर्भात माहिती मिळाल्यानंतर साक्री पोलीस त्याच्यावर पाळत ठेवून होते. न्यायालया बाहेर पडल्यानंतर वैभव पोळ याला पोलिसांनी शिताफिने पकडले. जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, उप अधीक्षक गवळी, स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक उपनिरीक्षक वसंत पाटील यांच्या पथकातील हवालदार विद्याधर ठाकूर, तुषार जाधव, पठाण यांनी कारवाई केली.

सैनिकी शाळेतील ईश्वरी हँडबॉल स्पर्धेसाठी पात्र



शिरपूर, दि.२३- मुकेश भाई आर. पटेल मुलामुलींची सैनिकी शाळेतील इयत्ता अकरावीची विद्यार्थिनी कु. ईश्वरी विलास राणे हिची वर्षांखालील मुलींच्या गटात राष्ट्रीय शालेय हँडबॉल स्पर्धे साठी महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली आहे.


जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सांगली यांच्या वतीने १८ ते २० नोव्हेंबर २०२६ दरम्यान लक्ष्मणराव किर्लोस्कर विद्यामंदिर अँड ज्युनिअर कॉलेज, पलूस (ता. पलूस, जि. सांगली) येथे राज्यस्तरीय शालेय हँडबॉल क्रीडा स्पर्धा आणि निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी नाशिक विभागस्तरीय शालेय हँडबॉल स्पर्धेत चमकदार कामगिरी करत तिने या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले होते.

राज्यस्तरीय स्पर्धेदरम्यान १९ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या निवड चाचणीत ईश्वरीने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडवत राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात आपले स्थान पक्के केले आहे. आता ती आगामी राष्ट्रीय शालेय हँडबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

या गौरवास्पद यशाबद्दल माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, सर्व ट्रस्टी, प्राचार्य दिनेशकुमार राणा यांनी अभिनंदन केले असून राष्ट्रीय स्पर्धेतील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

या दैदिप्यमान यशामागे स्पोर्टस् डायरेक्टर डॉ. किरण अंचन, मुख्य प्रशिक्षक सविता देशमुख, हँडबॉल प्रशिक्षक कुणाल सुर्वे, करण पाटील, कल्याणी सांगूनवेढे, क्रीडा समन्वयक डॉ. ज्योत्स्ना जाधव, क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर माळी यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचा क्रीडा विभाग आणि व्यवस्थापनाचे बहुमूल्य सहकार्य या यशामागे प्रेरणादायी ठरले असून, तिचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठीही अत्यंत अभिमानास्पद आणि ऊर्जा देणारे आहे.

प्रकाश में आज– शेरदिल



धर्मेंद्र अनिता राज रूषी कपूर किमी काटकर
कादर खान गुलशन ग्रोवर सत्यन कपूर

पान १ वरुन

लोकशाही मूल्ये व सामाजिक जबाबदारी रुजविण्यावर

नथवानी यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यात आली. शिक्षकांना सिविक एज्युकेशन अर्थात नागरिकत्व शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगणे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये नागरिकत्वाची जाणीव, सामाजिक जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे हा या प्रशिक्षण सत्राचा मुख्य उद्देश होता.

या एक दिवसीय प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांना विद्यार्थ्यांना जागरूक नागरिक, विचारशील व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक परिवर्तनाचे वाहक बनविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. सत्रामध्ये नागरिकत्व शिक्षण, समावेशक विचारधारा, पर्यावरण संवर्धन, सामाजिक संवेदनशीलता तसेच लोकशाही प्रक्रियेमधील सक्रिय सहभाग अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. यासोबतच विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि जबाबदार नागरिकत्वाचे संस्कार कसे रुजविता येतील, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सीएमसीए च्या प्रतिनिधींनी प्रशिक्षणाचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, आमचा उद्देश शिक्षकांना केवळ माहिती देण्यापुरता मर्यादित नसून, विद्यार्थ्यांना सामाजिक असंवेदनशीलता, तणाव आणि आजच्या काळातील विविध आव्हानांना सकारात्मक दृष्टिकोनातून सामोरे जाण्यास सक्षम बनविणे हा आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात आणि देशभरात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा आमचा प्रयतक आहे.

शिरपूर व परिसरातील शिक्षकांनी या प्रशिक्षण सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊन त्यांच्यामध्ये जबाबदार नागरिकत्वाची भावना निर्माण करणे ही शिक्षकांची महत्त्वपूर्ण जबाबदारी असल्याची जाणीव या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांना झाली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधताना सामाजिक मूल्ये आणि लोकशाही विचारांची रुजवणूक करणे किती आवश्यक आहे, यावरही यावेळी भर देण्यात आला.

या प्रशिक्षण सत्राला ऑनलाइन माध्यमातून सुष्मा शेट्टी व नीता घाडगे यांचे मार्गदर्शन लाभले. संपूर्ण उपक्रमाचे नियोजन व आयोजन यशस्वी करण्यासाठी द्रेता पटेल नथवानी यांच्या मार्गदर्शनाखाली अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशनच्या समन्वयिका सौ. सोनिया भसीन, प्रोजेक्ट हेड डॉ. गजानन पाटील, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी तसेच फाउंडेशनच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले.

शिक्षक सक्षम झाले तर विद्यार्थी सक्षम होतील आणि विद्यार्थी जागरूक झाले तर समाज अधिक जबाबदार बनेल, या विचाराला केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम जागरूक, सुजाण आणि जबाबदार नागरिक घडविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

सोनगीर येथील प्राचीन सोमेश्वर

प्रमाणात थाटण्यास सुरुवात झाली आहेत. या यात्रेत लोकनाट्याचे विशेष आकर्षण असणार आहे.यात्रेच्या दुसऱ्या दिवशी कुस्त्यांची दंगल आयोजित केली जाते. यात खान्देशातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतून मल्ल सहभाग घेतात.यात्रोत्सवात येणाऱ्या भाविकांची मोठी संख्या लक्षात घेता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सोनगीर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक तुषार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवला जाणार आहे.

सात वर्षीय चिमुकला गंभीर जखमी

भीतीचे वातावरण आहे. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक घराबाहेर पडायलाही घाबरत आहेत. नगरपालिकेने तातडीने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा आणि मुलांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.


सभेतही झाला होता प्रश्न

नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेतही भटक्या कुत्र्यांचा प्रश्न उपस्थित झाला होता. कुत्र्यांची संख्या वाढू नये म्हणून निर्बीजीकरणासाठी कुत्र्यांना पकडत असताना काही प्राणी प्रेमींकडून विरोध होत असल्याबद्दल आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी नाराजी व्यक्त केली होती. तसेच दुसऱ्या शहरातील कुत्रे छुप्या पद्धतीने नंदुरबारच्या आजूबाजूला सोडून दिले जात असल्याने शहरात कुत्र्यांचे झुंड येत असल्याचेही समोर आले आहे. प्रशासन आता जागे होणार का? असा सवाल नागरिक विचारत आहेत.

कारागृह अधीक्षकांचे हृदयविकाराने निधन

तीव्र झटका आला. त्यात त्यांचा मृत्यू झाला. सायंकाळी सातच्या सुमारास ही घटना घडल्याचे समजल्या नंतर सर्वांनी शोक व्यक्त केला. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, विवाहित मुलगी असा परिवार आहे.

त्यांचा मुलगा अमेरिकेत शिक्षण घेत आहे तर मुलगी पनवेल येथे राहते. प्रशासनाला घटनेच घटनेची माहिती मिळाल्यानंतर सायंकाळी उशीराने त्यांचा मृतदेह हिरे वैद्यकीय महाविद्यालयाकडे पोहचविण्यात आला. या ठिकाणी उद्या दि.२४ नोव्हेंबर रोजी शवविच्छेदन केल्यानंतर त्यांचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी कुटूंबियांकडे सोपविला जाईल. अशी माहिती जेल प्रशासनातर्फे देण्यात आली.



रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

शब्दकोडे क्रमांक.२४९८

आडवे शब्द : १.एक नक्षत्र व मुलीचे नाव ३.पक्ष्यांनी बांधलेले घर ५.कमावणारा ८.एक मुस्लिमआडनाव ९.एखादया गोष्टीसाठी पिच्छ पुरवणे १०.प्रियकर ११.किंमत १२.वाहून नेणारा १३.मळ १४.सान १६.हिंदीत-मावशी १७.अनिल कपूरचा एक सिनेमा १९.नगर २२.गोळा २३.एक रास,तागडी २४.खालचा ओठ २५.सोने २८.संशोधक ३०.बंध ३१.शाहीराचे वादय ३२.घाणेंद्रीय ३३.दौत बुडवण्याचे साधन ३५.चुलता ३६.पाठीचा कणा ३८.भात रोपाची केलेली रोवणी ३९.खूप आत ४०.चित्त ४१.सैर ४४.वड ४५.महीना ४७.जीवन-विरूदध ४८.मालक ५०.वसा चालवणारा **उभे शब्द :** १.एक हिंदी सिने नायिका,रेषा २.वनात राहणारे ३.अतुट ४.इंग्रजीत-पाढे ५.अप्पू-राजा सिनेमातील नायक ६.मुख ७.धातूचा बारीक तंतु ९.हिंदीत-बोबडा १३.पोट साफ न होणे ,शौचाशी निगडीत एक आजार १५.पराभव १६.हिंदीत-मरण १८.जुही चावला,सनी देओल यांचा एक सिनेमा २०.प्रवासी नाव हाकणारा २१.पूजाअर्चा २५.काम करणारा २६.गोंगाट २७.गरजवंत २८.दु:ख २९.सबब ३२.चौक ३४.मका ३५.रस्सा ३६.मनासारखे वागणे ३७.करणारा ४२.एक फळ वा देश ४३.किंमत ४६.चोरी करणारा ४९.नाही-विरूदध

शब्दकोडे क्रमांक.२४९७ चे उत्तर

वा	रे	मा	प	■	दा	न	व	■	आ	वा	रा
म	स	■	ला	ग	व	ड	■	नो	■	द	■
न	■	मा	य	■	त	■	ह	■	ब	क	री
■	दि	■	न	थ	■	ता	ल	ब	दध	■	ड
दि	वा	ना	■	र	वा	न	गी	■	को	प	र
मा	र	■	सं	थ	■	सा	■	वे	ष्ट	न	■
ग	■	आ	■	रा	ह	■	दा	त	■	न	ल
■	क	ड	व	ट	■	म्या	■	न	भ	■	व
ता	■	वा	द	■	म	न	न	■	ला	ग	ण
री	ता	■	न	ग	द	■	व	जा	■	दा	■
ख	■	वा	■	वा	न	र	■	न	व	रो	ज
■	त	डी	पा	र	■	ती	न	■	को	ळ	सा



एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय स्पर्धेत निवड

शिरपूर, दि.२३ : शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित एच. आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन स्तरांवरील एकूण विद्यार्थ्यांची उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत आयोजित अविष्कार २०२६-२७ या विद्यापीठस्तरीय संशोधन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. एकूण संघांचा या निवडीमध्ये समावेश असून, जिल्हास्तरीय फेरीत उत्कृष्ट सादरीकरण करून विद्यार्थ्यांनी पुढील फेरीत स्थान मिळवले आहे.

विद्यार्थ्यांनी आरोग्य, पर्यावरण, सामाजिक प्रश्न आणि तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांतील समस्यांवर आधारित संशोधन प्रकल्प सादर केले. या प्रकल्पांमधून विद्यार्थ्यांची संशोधनवृत्ती, चिकित्सक विचारसरणी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण संकल्पना मांडण्याची क्षमता अधोरेखित झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयातील संशोधनपूरक शैक्षणिक वातावरण आणि नवोपक्रमांना दिले जाणारे प्रोत्साहन पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

यात पदव्युत्तर पदवी स्तरात विशाल बागुल, संजना चोरडिया, कल्याणी बिरारी, सुष्मिता पाटील, शोहेब मान्यार तसेच पदव्युत्तर स्तरात विशाखा मोरे, अक्षदा दातीर, अवनी भावसार, सृष्टी वराडे, उन्नती चौधरी, वाल्मीक बाविस्कर, रोशन ढाडीवाल, आदित्य जाधव, आयुषी पेठे, भटुलाल बोरसे आणि पदवी स्तरात तेजस बागल, दिव्या बेलदार, जान्हवी नेरकर, महेश नांद्रे, रेणुका भाले, रेणुका भावसार, गौरव भंडारे, लक्ष्मी जांगीड, रितेश पाटील, वैष्णवी बडगुजर, अदिती दायमा, शीला नाईक, प्रियंका जाधव, हरीश बोरसे, वैभव महाजन, उदय कांबळे, ईशा कुवर, जान्हवी सपकाळे, अनुप धनगर, गौरी चौधरी या विद्यार्थ्यांची विद्यापीठ स्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, सर्व संचालक, प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी समाधान व्यक्त केले. तसेच आगामी विद्यापीठस्तरीय स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील लौकिकात भर घालावी, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

जैन संघटनेचा मंथन सामाजिक संवाद कार्यक्रम

शिंदखेडा, दि.२३- भारतीय जैन संघटनेच.मंथन सामाजिक संवाद हा कार्यक्रम दिनांक पाच व सहा डिसेंबर२०२६रोजी धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा,शिरपूर,पिंपळनेर व नंदुरबार जिल्ह्यात शहादा अक्कलकुवा खापर येथे होणार आहे.ही माहिती शिंदखेडा येथे जैन समाजाच्या झालेल्या बैठकीत खानदेश विभाग अध्यक्ष प्रा.चंद्रकांत डागा यांनी दिली. यावेळी संघटनेचे मुख्यालय पुणे येथून निरीक्षक म्हणून अमित ढाणे हे उपस्थित होते.

जैन समाजात कुटुंबातील संवाद कमी होणे, वाढते जनरेशन गॅप, लग्नाला घेऊन बदललेले विचार, भावनात्मक दरी आणि असमजसपणा अशा अनेक समस्यांना तोंड देत आहे याचे समाधान म्हणून भारतीय संघटनेने आपल्या ४० वर्षाच्या सामाजिक अनुभवावर आधारलेला संस्थापक शांतीलाल मुथा व व्यवस्था संचालक कोमल जैन यांनी हा विशेष कार्यक्रम तयार केला आहे.या कार्यक्रमात भारतीय संघटनेचे वरिष्ठ प्रवक्ता व संघटनेचे राष्ट्रीय सचिव दिनेश पालरेचा (होस्पेट कर्नाटक) जैन समाजाचे या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक डॉ. पी. ओ. पाटील, डॉ. एल. आर. झंवर, डॉ. जी. बी. पाटील, डॉ. व्ही. के. चटप, डॉ. आर. ई. मुथा, डॉ. जमीर खान, डॉ. प्रशांत पाटील डॉ. आर. एस. ताडे, प्रा. विशाल बागुल, डॉ. डी. एम. पाटील, प्रा. शोहेब मान्यार, प्रा. कोमल भोई यांचे मार्गदर्शन लाभले. तरुण तरुणी महिला पुरुष नागरिकांनी सोबत गहन चर्चा करतील व आपल्या अनुभवाच्या आधारावर मार्गदर्शन करतील. होणाऱ्या सर्व ठिकाणच्या कार्यक्रमाला संघटनेचे राज्य अध्यक्ष केतन शाह, राज्य महासचिव प्रवीण पारख ,राज्य उपाध्यक्ष विनय पारख,राज्य माजी उपाध्यक्ष हरकचंद बोरा, राज्य सचिव विजय दुगड ,खानदेश विभाग अध्यक्ष प्रा. चंद्रकांत डागा उपस्थित राहणार आहे.

५ डिसेंबर २०२६ शनिवार रोजी शिंदखेडा येथील बिजासनी मंगल कार्यालय, स्टेशन रोड, येथे सकाळी नऊ ते अकरा, शिरपूर दुपारी चार ते सहा व पिंपळनेर येथे रात्री आठ ते दहा दरम्यान तसेच सहा डिसेंबर २०२६ रविवार रोजी शहादा येथे सकाळी दहा ते बारा ,अक्कलकुवा येथे चार ते सहा व खापर येथे रात्री आठ ते दहा दरम्यान कार्यक्रम होणार आहे.

शिंदखेडा येथील या बैठकीला चंद्रकांत डागा, अशोक राखेचा, राजमल बोथरा, राजेंद्र बाफना, गिरीश टाटीया, मयूर ओस्तवाल, सुरेश गिडिया, हितेंद्र जैन, लखीचंद बोथरा, प्रवीणकुमार पारख, रमेश कर्नावट, संजय म.पारख आदी उपस्थित होते.

एस.व्ही.के.एम.इंजि.च्या प्रतिक कोळी ला सुवर्णपदक

शिरपूर, दि.२३- जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत एस.व्ही.के.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, दहिवद ता. शिरपूर येथील प्रतिक कोळी या विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयातील द्वितीय वर्ष बी.टेक.चा विद्यार्थी प्रतिक कोळी याने आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या यशामुळे महाविद्यालयासह शिरपूरच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ, लोणेरे यांच्या अंतर्गत तसेच शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक, शिरपूर यांच्या आयोजनाखाली आंतरविभागीय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा एस.पी. डी.एम. महाविद्यालयाच्या बॉक्सिंग हॉलमध्ये पार पडल्या. या स्पर्धेत विविध खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत प्रतीक कोळी याने ७५ ते ८० किलो वजन गटात दमदार कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आणि सुवर्णपदक मिळवले. त्याच्या खेळातील चपळता, जिद्द, अचूक पंचेस आणि मैदानावरील आत्मविश्वासाने त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

वरिष्ठ व निवड वेतन श्रेणीसाठी शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण

शहादा, दि.२३ (प्रतिनिधी)- बारा वर्षांपेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या शिक्षकांसाठी वरिष्ठ वेतन श्रेणी, तर २४ वर्षांपेक्षा अधिक सेवा झालेल्या शिक्षकांसाठी निवड वेतन श्रेणीसाठीचे दहा दिवसीय सेवांतर्गत प्रशिक्षण शहाद्यात उत्साहात सुरू आहे. मोहिदा येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेत १३ नोव्हेंबरपासून प्रशिक्षण सुरू होऊन २२ नोव्हेंबरला त्याचा समारोप झाला.

प्रशिक्षणात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील एकूण २७७ शिक्षक सहभागी झाले आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण तसेच राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार शालेय कामकाजाच्या विविध पैलूंवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले जात आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, विविध शासकीय योजना, शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा, शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्ताचा वापर, २१ व्या शतकातील कौशल्ये, भारतीय ज्ञान प्रणाली, शैक्षणिक संशोधन, माहितीचा अधिकार कायदा, सेवा हमी कायदा आदी विषयांचा प्रशिक्षणात समावेश आहे.

यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार येथील अधिव्याख्याता चंद्रकांत पवार तसेच जिल्हा समन्वयक व केंद्र समन्वयक, शहादा यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. माधवराव मोरे हे विशेष साधन व्यक्ती, तर मनोज खैरनार व हेमंत पाटील तांत्रिक सहाय्यक म्हणून काम पाहत आहेत. प्रशिक्षणातील सहा वर्गांसाठी एकूण २४ शिक्षक सुलभक म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत.

दुरुस्ती

दि.२३/११/२०२६

सोमवार रोजी दै. आपला महाराष्ट्रमध्ये पा. नं. ३ वर ॲड. सचिन गोपाळकृष्ण शर्मा यांची जाहीर नोटीसीत सुशील दिनेश जैन असे अनावधानाने प्रसिद्ध झाले असून त्या ऐवजी सुशिला दिनेश जैन असे वाचावे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र.ल. येथील गट नं.१२०/१/ब यापैकी १) प्लॉट नं.३४ चे एकूण क्षेत्र १५०.०० चौ.मी. बखळ प्लॉट २) प्लॉट नं.३५ चे एकूण क्षेत्र १५९.०० चौ.मी. बखळ प्लॉट यांसी चतु:सिमा

दिशा	प्लॉट नं.३४ चतु:सिमा	प्लॉट नं.३५ चतु:सिमा
पुर्वेस-	प्लॉट नं.३५,	गट नं.११९,
पश्चिमेस-	प्लॉट नं.३३,	प्लॉट नं.३४,
दक्षिणेस-	गट नं.१२९,	गट नं.१२१,
उत्तरेस-	रस्ता,	रस्ता.

येणे प्रमाणे वर्णनाची आतील बखळ प्लॉट ज्योती पुरुषोत्तम पाटील व सुमन रमेश पाटील रा.धुळे यांचे मालकीचा व ताबे उपभोगातील असून त्यानी सदरहू बखळ प्लॉट कायमस्वरुपी करणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिल यांच्याशी सदर बखळ प्लॉट चा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर बखळ प्लॉट च्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर बखळ प्लॉट वर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर बखळ प्लॉट संबधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्राद जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरचा बखळ प्लॉट निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. ठिकाण- धुळे, दिनांक- २३/११/२०२६.

ॲड.चेतन महादु यादव
ऑफिस- सि.स.नं.२५९७/अ, श्रीसदगुरु सदन, गल्ली नं.५,
मिरच्या मारुती चौक, धुळे-४२४००१. **मो.नं.९६८९१२४६९२**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, पतपेढी, वित्तीय, संस्था, संबंधितास, मिळकतीचे मुळ मालक, तसेच मिळकतीबाबत व त्यांचेकडेस या मिळकतीबाबत हक्क दाखविणाऱ्या सर्व वारसांस तसेच इतर कुठल्याही स्वरूपाचा व्यवहार करणार सर्व संबंधितास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकार-**श्री. संदीप चंद्रकांत चौधरी रा. दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.** यांनी उताऱ्यावरील मालक- **श्रीमती दामोताबाई राघो कोळी रा. दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.** यांचे सोबत मौजे-दोंडाईचा .ता. शिंदखेडा,जि. धुळे शिवाराती दोंडाईचा नगरपालिका हद्दीतील शेतजमीन **ग.नं.४४५/१/ब एकूण क्षेत्रफळ - ०१. हे ७४ आर यास आकार १.७० यास चतु:सिमा - गाव नकाशा** प्रमाणे येणे प्रमाणे मिळकतीचा कायम खरेदी घेण्याचा सौदा अगर करार केलेला असून, आमचे पक्षकारांनी लिहून देणार यांना काही रक्कम बयाणा म्हणुन देखील दिलेली असुन,सौदा करून घेतलेला आहे. आमचे पक्षकार लवकरच व्यवहार पुर्ण करणार आहेत.सदर नोटीस ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आहे. तरी सदर व्यवहाराबाबत मिळकतीचे कुठल्याही हितचिंतकाची, सौदा करार, मदार, खरेदी, खावटी, इतर वारस,ज. मु, मृत्युपत्र वगैरे करणार यांची अगर कोणाचीही कुठल्याही स्वरूपाचा व्यवहार करणारे बँक,पतपेढी,वित्तीय संस्था,यांची अगर कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत,दावा,फाटा,वहिवाट,इतर अधिकार असल्यास,तसेच इतर कुणाचे मालकी हक्क असल्यास,खरेदीखताचे ओरिजनल दस्त असल्यास,बेकायदेशीर व्यवहार होत आहे, किंवा उताऱ्यावरील मालकांचे हक्काबाबत अगर मिळकत दुबार खरेदीखत होत आहे. वगैरे आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आमचे पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी स्वरूपात हरकत कळवावी,परस्पर वर्तमानपत्रात हरकत घेवू नये.मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ह्या आमचे पक्षकारांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. मुदतीत कोणाचीही लेखी तक्रार योग्य त्या कागदपत्रासह प्राप्त न झाल्यास मिळकत निर्बोझ समजून,आमचे पक्षकार हे व्यवहार पुर्ण करतील. परस्पर वर्तमान पत्रात दिलेली हरकत ग्राह्य धरण्यात येणार नाही. सदरची नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांच्या वतीने आमचे मार्फत प्रसिध्दीस देण्यात येत आहे. दोंडाईचा. दिनांक.२३/११/२०२६

ॲड.सचिन अशोक चौधरी मो.९४२२६१९६०१
पत्ता : दोंडाईचा सिविल ॲण्ड क्रिमिनल कोर्ट आवार शॉप नं.१३,४२५४०८,जि.धुळे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन - मौजे महिंदळे येथील स.नं.५२/२ पैकी प्लॉट नं.१० चे एकूण क्षेत्र १५० चौ.मी. बखळ प्लॉट. यास विस्तारित सि.स.नं.२५३४ क्षेत्र १२३.५० चौ.मी. बखळ प्लॉट.

यासी चतु:सिमा

पुर्वेस : स.नं.५१ पैकी प्लॉट नं.३
पश्चिमेस : आकाश ग्यानचंदानी यांचे घर प्लॉट नं. ९
दक्षिणेस : महावीर कॉलनी रोड, ८ मी.
उत्तरेस : स.नं.५२/१ मधील प्लॉट नं.२०

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक श्री मिलींद उत्तमराव परदेशी रा.२/अ, विद्या विहार कॉलनी, मलेरिया ऑफिस जवळ, साक्री रोड, धुळे व श्री संदेश उत्तमराव परदेशी रा. सव्हाना, अमेरिका यांचेशी कायम खरेदी करणेचा तोंडी सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमुद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे वतीने आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे. दिनांक.२३/११/२०२६

ॲड. रोहित राजकुमार छाबिडया
ब्लॉक नं.आर/२,रुम नं.१,कुमार नगर,साक्री रोड,धुळे.
मो.९९२२८२८८८३,७४९९९९८९७५

जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी, निमसरकारी संस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतींचे वर्णन:- मौजे धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.११ सर्वे नं.५७४/१ सि.टी.एस.नं.१४५२ धुळे पेठ विभाग चे एकूण क्षेत्र ५१०० चौ.फुट चतुसिमा:- पुर्वेस लागून :- ३० फुट चितोड रोड, पश्चिम:- लागून प्लॉट नं.१०, उत्तरेस :- लागून साईड रोड (बोळ), दक्षिणेस लागून :- प्लॉट नं.१२ येणे प्रमाणे चतु:सिमातील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी डॉ. श्री.राजेंद्र एकनाथ सोनवणे व डॉ.सौ.उमा राजेंद्र सोनवणे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

सबब तमाम लोकांना, बँका, पतसंस्था, सहकारी संस्था या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीमध्ये कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, कुळ, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत ॲड. आनंद एस. जगदेव, २१ब, 'तथागत' चंदन नगर, देवपुर, धुळे या पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात १५ व्या दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची नोटिस पक्षकाराने दिलेल्या माहिती वरून व सांगण्यावरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक- २३/११/२०२६. नोटीस देणार तर्फे

ॲड.आनंद एस.जगदेव
२१ब, 'तथागत' चंदन नगर, देवपूर, धुळे.
मो.नं.९४२२२८८६२८, ९५८८४०९९४०

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व बँका,सर्व वित्तीय पतसंस्था यासी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकत वर्णन तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी धुळे म. न. पा. हद्दीतील मौजे देवपूर येथील सर्व्हे नं. ३६/१ पैकी प्लॉट नं. २१ चे एकूण क्षेत्र ३७१.६० चौ. मी. (४००० चौ. फुट) यास विस्तारीत सिटी सर्व्हे नं. ८४८९ चे एकूण क्षेत्र ४१५.१० चौ. मी. सत्ता प्रकार क बखळ प्लॉट

यासी चतु:सिमा
पूर्व : प्लॉट नं. ३
पश्चिमेस : ३० फुट, रस्ता
दक्षिणेस : प्लॉट नं. २२
उत्तरेस : प्लॉट नं. २०

वरील वर्णनांचे बखळ प्लॉटचे मालक डॉ. श्रीकांत कैलास दलाल व सौ. किशोरी कैलास दलाल रा. ९२ जयहिंद कॉलनी, देवपूर धुळे यांनी उपरोक्त बखळ प्लॉटची कायमस्वरुपी विक्रीबाबत आमचे अशिल यांचेशी विक्रीचा सौदा करार केला आहे.

मिळकत निर्बोज व निर्वेध असल्याचे सांगितले आहे. उपरोक्त बखळ प्लॉटचे बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, गहाण, तारण, वहीवाट, कुळ जमीन जप्ती, टांच, वारस, बक्षिस, बोजा, सौदा करार, खरेदी विक्री, इ. बाबत हरकत असल्यास प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करुन शहानिशा करुन द्यावी. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्बोज आहे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे. प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दि. २०/११/२०२६

ॲड.ललित चांगदेव गायकवाड
प्लॉट नं. ५, भावसार कॉलनी,
जमनागिरी रोड, धुळे
मो. ९७६४२८०४३४,
९४०३८४४४७९

जाहीर नोटीस

तमाम लोकांना व जनतेस, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे, ता. जि. धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील रहिवासकामी बिनशेती **गट नंबर २५ मधील प्लॉट नं.८ चे एकुण क्षेत्र ९७.०५ चौ.मी.** (बखळ प्लॉट) त्यांस चतु:सिमा खालीलप्रमाणे...

पुर्वेस – गट नंबर २२.
पश्चिमेस – ६ मिटरचा रस्ता.
दक्षिणेस – प्लॉट नंबर ९.
उत्तरेस – प्लॉट नंबर ७.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील प्लॉट हा श्री. नितीन विठ्ठल चौधरी रा. धुळे यांच्या मालकीचा व तावेउपभोगातील असून सदर प्लॉट हा आमचे अशिल श्री. मयुर प्रमोद जाधव यांनी कायम खरेदी विकत घेणेचा सौदा केलेला आहे. त्यापोटी बयाणा म्हणून काही रक्कम दिलेली आहे. आता लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकतीबाबतीत वरील मिळकत अन्य कोणासही गहाण, दान, खरेदी, विक्री, बक्षिस, अदलाबदल, लिज, कोणत्याही वित्त संस्थेचा बोजा, लिव्ह ॲण्ड लायसेन्स अथवा भाडे तत्वावर तबदील केली असल्यास अथवा कोणत्याही प्रकारचे खाजगी अगर सरकारी कर्ज, बोजा, तारण, वारस, भाऊबंदकी, वहीवाट व कोणत्याही प्रकारचे वाद, दावा वगैरे असल्यास सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसाच्या आंत खालील पत्यावर लेखी पुराव्यानिशी हरकत कळवावी. टपाल, फोनवर वर्तमान पत्रात परस्पर दिलेली हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर प्लॉट निर्वेद व निर्बोज समजुन आमचे अशिल सदरहू बखळ प्लॉटचे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांनवर बंधनकारक राहणार नाही.

सदर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-धुळे. दिनांक.-२३/११/२०२६

ॲड.पुरूषोत्तम श्रावण महाजन
ऑफिस पत्ता : बागुल संकुल, साई हॉस्पीटल, गाळा नं.जी ९,दत्तमंदिर,देवपुर,धुळे.४२४००२

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँका, पतसंस्था, सर्व वित्तीय संस्था ई. यांना जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की,

मौजे वलवाडी ता.जि.धुळे यथिल स.नं.२७ पैकी प्लॉट नं.५८ चे एकूण क्षेत्र ३०७.०० चौ.मी. या पैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र १५४.०० चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पूर्वेस - वापर व रस्ता, पश्चिमेस - प्लाट नं.५७ अ, ५७ ब, दक्षिणेस - प्लॉट नं.५९, उत्तरेस - याच प्लॉट नं. ५८ चा उर्वरित भाग येणे प्रमाणे हा बखळ प्लॉट १) श्री विकास मधुकर पेंढारकर, २) सौ निकेता विकास पेंढारकर दोघे रा. राम नगर, वडिभोकर रोड, देवपुर, धुळे, ता. जि. धुळे यांच्या मालकीचे व कब्जे उपभोगातील असून यांच्या कडून आमच्या अशिलांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला आहे बयाना रक्कम देखील अदा केलेली आहे सदर प्लॉट नीबोंज, निर्वीवाद असल्याचे प्लॉट मालक यांनी सांगितले आहे. तरी सदर प्लॉट बाबत कोणाचेही गहाण, दान, टाच, खरेदी - विक्री, सौदा पावती, अथवा इतर कोणतेही कायदेशीर हस्तान्तरीत व्यवहार असल्यास ७ (सात) दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष कागदपत्रे सादर करून आपल्या हरकती कळवाव्यात. पोस्टाने, परस्पर वर्तमान पत्राद्वारे तसेच मोबाईल द्वारा घेण्यात येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर तसेच वरील प्लॉट वर बंधनकारक राहणार नाहीत.

येणे प्रमाणे पक्षकारांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे आमच्या मार्फत जाहीर नोटीस असे

धुळे. दिनांक २३/११/२०२६

ॲड.अमित अशोक वाघ
नोटरी (भारत सरकार)
२२,"श्रीराम वाटीका" मधुबन
कॉलनी,वाडीभाकर रोड, देवपुर,धुळे.
मो. ९८२३१३६००७

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक श्री. रामकृष्ण सोमा पाटील रा. बिलाडी ता. जि. धुळे यांनी आमचे अशिल श्री. जितेंद्र दिलीप सयाजी रा. बिलाडी ता. जि. धुळे यांना कायम विक्री करण्याचा सौदा केला असून सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध, निर्बोज व निजोखमी असून ती विक्री करण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना दिलेला आहे.

सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिलांना लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी व निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टाच, बक्षिस, बोजा, लीज,. सौदा, करार, मुखत्यार, पोटगी, मृत्यूपत्र, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, आरक्षण, सॉल्वन्सी, हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानिशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजुन अथवा कोणाचे हक्क, हितसंबध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील व मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांर तसेच नमूद मिळकतीवर बंदनकारक राहणार नाही.

परिशिष्ट : मौजे बिलाडी ता. जि. धुळे येथील शेत जमीन गट नं. ८०/२/अ चे क्षेत्र ला., ला. ० हे. ४५ आर आकार रु. १.१९ पैसे यांसी चतु:सिमा मंजूर गाव नकाशाप्रमाणे.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे : दिनांक : २३/११/२०२६

ॲड. विजय म. मोरे
नोटरी-भारत सरकार, रा.बी/१२,
भन्साली प्लाझा, नगरपटटी,धुळे.
मो. ९८२२८७२६९०

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे धुळे, ता.जि.धुळे येथील सर्व

पान १ वरुन

नीटसह सर्वच परीक्षा आयोजनात उच्चस्तरीय समिती

संधी उपलब्ध करून देणे, अभ्यासक्रमाच्या स्वरूपानुसार परीक्षा पद्धती निश्चित करणे, तसेच स्पर्धात्मक आणि प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही आढावा घेण्यात आला. पेपरफुटी नंतर सरकारचा पुढाकार

गेल्या काही महिन्यांत नीटसह विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय परीक्षांच्या पेपरफुटीच्या घटनांमुळे देशभरात संताप व्यक्त करण्यात आला होता. महाराष्ट्रात नीट, सीईटी, टीईटी तसेच एमपीएससी परीक्षांमधील कथित गैरप्रकारांमुळे विद्यार्थी आणि पालकांनी आंदोलन केले होते. परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी आणि पारदर्शक परीक्षा व्यवस्था निर्माण करण्याच्या मागणीने आंदोलन तीव्र झाल्यानंतर सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर एनटीएच्या परीक्षा आयोजनात केंद्र आणि राज्य सरकारमध्ये अधिक प्रभावी समन्वय निर्माण करून विद्यार्थ्यांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि विद्यार्थी-केंद्रित परीक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण मानली जात आहे. परीक्षा केंद्रे, मनुष्यबळ, लॉजिस्टिक व्यवस्थापन आणि पारदर्शकतेवर भर देत विद्यार्थ्यांना सुरक्षित व विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था उपलब्ध करण्यासाठी सरकारचा पुढाकार घेत असल्याचे सांगण्यात आले.

लाडकी बहीण योजनेमुळे तिजोरीवर ताण

बहिणींना बाजूला करता येत नाही. त्यामुळे धरले तर चावते आणि सोडले तर पळते, अशी सरकारची अवस्था झाली आहे. आर्थिक ताण असला तरी सरकार या परिस्थितीतून मार्ग काढेल आणि कोणत्याही बाबतीत कमी पडणार नाही. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अन्य संबंधित नेत्यांच्या नेतृत्वाखाली सरकार एकजुटीने काम करत असून, राज्यासमोरील आर्थिक अडचणी दूर करण्यात यश मिळेल, अशी खात्री त्यांनी व्यक्त केली. संभाव्य दुष्काळी परिस्थितीवर भाष्य करताना झिरवाळ यांनी १९७२ च्या दुष्काळाचा दाखला दिला. त्यावेळी अन्नधान्याचा दुष्काळ होता. मात्र, आज अन्नाची टंचाई नसून पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. पिण्याचे पाणी रेल्वे किंवा विमानाने पोहोचवण्यासारख्या उपाययोजना कराव्या लागू शकतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.

मा.मुख्यमंत्र्यांच्या शोरूममधून चोरट्यांनी तिजोरीच पळवली

गुन्हे शाखेचे पथक आणि फॉरेन्सिक विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शोरूमची पाहणी करून आवश्यक पुरावे संकलित केले. तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांच्या हालचालींचा मागोवा घेण्याचे काम सुरू आहे. तिजोरीत नेमकी किती रक्कम किंवा मौल्यवान वस्तू होत्या, चोरीमागे कोणाचा सहभाग आहे आणि आरोपी कोण आहेत, याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. खासदार अशोक चव्हाण यांच्या शोरूममध्येच चोरीची घटना घडल्याने शहरातील व्यापारी व व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहरात अठ्ठावीस ई-बसेस धावणार

अठ्ठावीस ई-बसेस देण्यात आल्या आहेत. त्यासाठी बारा कोटींचे अनुदान देण्यात आले आहे. बसेसचा मार्ग, स्टॉप, बस नियंत्रणासाठी यंत्रणा, अधिकारी, कर्मचारी, चालक, वाहक तसेच इतर कर्मचाऱ्यांची नेमणुक केली जाईल. प्रदुषणमुक्त ई-बसेसमुळे प्रवाशांना सोयीचे होणार आहे. दरम्यान विरोधी पक्ष नेता बंटी खोपडे यांनी शहरात ई-बस सुरू करण्यासाठी स्पेशल परपज व्हेहीकल साठी महानगरपालिका अधिनियमानुसार राज्याशासनाची परवानगी घेतली का? ई-बससेच्या माध्यमातून येणारा नफा अथवा तोटा महापालिका स्विकारणार आहे का ? असा सवालही उपस्थित केला.

माजी स्थायी समिती सभापती किरण कुलेवार यांनी ई-बस सेवातंर्गत महिला सुरक्षितेसाठी उपाय योजना करावी. हेल्पलाईन नंबर, सी.सी.टी.व्ही.कॅमेरे असतील का ? चार्जिंग स्टेशन कुठे असतील ? जाहिर करण्यात आलेल्या अठ्ठावीस ई-बसेस मिळणार आहेत का ? असा संशय व्यक्त केला. याचवेळी नगरसेवक अमोल मासुळे यांनी शहरात ई-बसेस धावत असतांना दिल्लीतील निर्भय हत्याकांडाची पुनरावृत्ती होणार नाही, याबाबत काळजी घेण्याची सुचना केली. माजी महापौर जयश्री अहिरराव यांनी ई-बसेस मधुन तोटा आल्यास कोण सहन करणार ? याबाबत कंपनीशी बोलुन घ्यावे व लाडक्या बहिणींसाठी तिकीट दरात विशेष सवलत देण्याची सुचना ही यावेळी केली.

स्विकृत नगरसेवक गणेश जाधव यांनी ई-बसेसचा विमा काढण्यात यावा. बसेसच्या मार्गातील अतिक्रमणे काढण्यात यावी. तसेच वाहकांसह कंडक्टरची वशिल्याने भरती करू नये. असेही महासभैत बजावले. यावेळी ललित माळी यांनी शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, कामगारांना तिकीट दरात सवलत देण्याचे सुचवले. तसेच माजी महापौर जयश्री अहिरराव यांनीही लाडक्या बहिणींना देखील तिकीट दरात सवलत मिळावी अशी मागणी विशेष महासभेत केली. दरम्यान माजी उपमहापौर भगवान गवळी यांनी उपरोधीतपणे ई-बसेस सर्वांना मोफत करा असे म्हणत कंपनीत महापालिकेतील एकाही नगरसेवकाला पार्टनर करू नका. सदस्यांना कमिटीतही घेवू नका. अशा सुचना करत आता आवरा आणि विषयाला मंजूरी देण्याचे सांगितले.

विरोधकांची मुस्कटदाबी

विशेष महासभा सुरू असतांना विरोधी पक्ष नेता बंटी खोपडे यांनी प्रभागातील पिठाच्या गिरणीबाबतचा विषय उच्चारताच उपमहापौर ज्योत्सना पाटील यांनी महासभेत विषयाला मंजुरी मिळाल्यानंतर बोला. असे सांगितले. ई-बस चा विषय मंजुर झाल्यानंतर विरोधी पक्ष नेता पिठाच्या गिरणीचा प्रश्न उपस्थित करताच सभा आटोपती घेवून राष्ट्रगीताने महासभेची सांगता करण्यात आली. सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांच मुस्कटदाबी होत असल्याची चर्चा सभागृहात चांगलीच रंगली.

कार्तिक स्वामी मंदिर दर्शनासाठी खुले राहणार

भाविकांना सुलभ आणि सुरक्षित दर्शन घेता यावे यासाठी आवश्यक ठिकाणी प्रखर प्रकाशझोत असलेले दिवे, बॅरिकेड्स, विद्युत रोषणाई, रस्त्यांची डागडुजी आणि परिसराची स्वच्छता करण्यात आली आहे. भाविकांनी दर्शनासाठी रांगेत यावे, सुरक्षित अंतर राखावे आणि शिस्तीचे पालन करावे, असे आवाहन मंदिराचे प्रमुख भरत विष्णुप्रसाद अग्रवाल यांनी केले आहे. या प्राचीन मंदिराची स्थापना शेठ पन्नालालजी जीवनरामजी अग्रवाल यांनी संवत १९८२, श्रावण शुद्ध अष्टमी या दिवशी केली होती. जुन्या पद्धतीच्या घुमटाकार मंदिरात श्री गणपती, भगवान शिवशंकर, माता पार्वती आणि श्री हनुमान यांच्या आकर्षक संगमरवरी मूर्तींसह श्री कार्तिक स्वामींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

भाविकांनी श्री कार्तिक स्वामींच्या दर्शनाचा, पूजा-अर्चेचा, महाप्रसादाचा आणि कीर्तनाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे नम्र आवाहन भरत विष्णुप्रसाद अग्रवाल यांनी केले आहे.

विहिरीत उतरलेल्या बापाचा दुर्दैवी मृत्यू

पडल्याचे पाहून जवळच असलेल्या पोपट लहानू गावित (४४) यांनी तात्काळ विहिरीत उडी घेतली.पाणी खोल असल्याने व तळाचा अंदाज न आल्याने दोघे बाप लेक पाण्यात बुडाले. यानंतर ग्रामस्थांनी दोघांना पाण्यातून बाहेर काढून पिंपळनेर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. यावेळी उपस्थित डॉक्टरांनी दोघांना तपासून मयत झाल्याचे सांगितले. याप्रकरणी पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली आहे.

व्यावसायिकावर प्राणघातक हल्ला

येथील पाण्याच्या टाकीजवळ वाद घातला. हाताबुक्क्यांनी मारहाण करीत कोयत्याने वार करून दुखापत केली, ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी वरील संशयितांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

पान १ वरुन

शिंदखेडा ता.च्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, सिंचन

जिजाबराव पाटील, मुकेश गिरासे, ध्वनंजय पिंगळे, प्रभाकर पाटील, विश्वनाथ पाटील, आर. आर. पाटील, आत्माराम पाटील, पी. एल. पाटील, अशोक पवार, सरपंच लक्ष्मीकांत पाटील, माजी सरपंच भाऊ पाटील, नगरसेवक सुयोग भदाणे, चेतन परमार, सुभाष जगताप, पप्पू मराठे, शैलेश पवार, अमृत पाटील, किशोर बाबूलाल पवार, उपअभियंता अजयकुमार पवार, उपअभियंता तेजस गोसावी, कनिष्ठ अभियंता शुभम राजपूत, मोहनसिंग गिरासे, कौतिकलाल साळुंखे, विकास पवार, राहुल पाटील, नरेश बागूल, सुरेश सोनवणे, विकास जाधव, भगवान पवार, किशोर तेजस पवार, सुरेश पाटील, भरत जाधव, अमर गिरासे, नितीन गिरासे यांच्यासह विविध गावांचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, शिंदखेडा तालुक्यात गेल्या दोन दशकांत रस्ते, पूल आणि दळणवळणाच्या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. तापी काठावरील गावांना जोडणाऱ्या रस्त्यांमुळे नागरिकांचा प्रवास सुलभ झाला असून, शेतीमालाच्या वाहतुकीलाही चालना मिळाली आहे. नेवाडे परिसरातील रस्त्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांना त्याचा थेट लाभ होणार आहे. नेवाडे ते वरपाडे आणि परिसरातील इतर जोडरस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. परिसरातील रस्त्यांच्या कामांसाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने आणि नियोजित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना पालकमंत्री श्री. रावल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना प्राधान्य

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत उपाययोजना राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांचे पंचनामे करून पात्र लाभार्थ्यांना आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. ज्या पात्र शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही, त्यांच्यापर्यंतही लाभ पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. शेतकऱ्यांसाठी मोफत कृषी वीज, नमो शेतकरी महासन्मान निधी आणि शेतकरी कर्जमुक्ती यांसारख्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातूनही आर्थिक सहाय्य दिले जात असल्याचे पालकमंत्री श्री. रावल यांनी नमूद केले.

नेवाडे परिसरातील रस्त्यांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. संबंधित विभागांनी कामांच्या गुणवत्तेवर नियमित लक्ष ठेवावे. रस्ते, पाणी, सिंचन, शिक्षण आणि रोजगाराच्या सुविधा अधिक बळकट करून शिंदखेडा तालुक्याला प्रगत आणि समृद्ध बनविण्यासाठी सातत्याने प्रयतक करण्यात येतील, अशी ग्वाही पालकमंत्री श्री. रावल यांनी यावेळी दिली.

रस्ते व पुलांच्या कामांसाठी ४९९.९२ लाखांची तरतूद

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभागामार्फत शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा-वरवाडे परिसरातील विविध रस्ते व पुलांच्या कामांसाठी ४९९.९२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या कामांत भाग- आमळथे ते वरवाडे (नवाडे गावात) या मार्गावरील १,६५० मीटर लांबीच्या काँक्रीट रस्त्याचे बांधकाम, सुलवाडे ते रामा-१२ या मार्गावरील १,००० मीटर लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरण, तसेच वरवाडे येथे लहान पूल व संरक्षण भिंतीच्या बांधकामाचा समावेश आहे. या कामांमुळे परिसरातील गावांची रस्ते जोडणी अधिक मजबूत होऊन नागरिकांची वाहतूक सुरक्षित व सुलभ होणार आहे. ही कामे पूर्ण करण्यासाठी ९ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.



पटेल महिला महा.च्या विद्यार्थिनींचा विद्यापीठ गुणवत्ता यादीत समावेश

शिरपूर, दि.२३- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या परीक्षेच्या गुणवत्ता यादीत शिरपूर येथील एच. आर. पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील भूगोल आणि संरक्षणशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे. विविध विषयांमध्ये विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली असून संस्थेच्या शैक्षणिक क्षेत्रातील लौकिकात भर पडली आहे.

महाविद्यालयाच्या भूगोल विभागातून दिव्या अनिल मोरे हिने विद्यापीठ गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकाचा बहुमान मिळविला आहे. तिच्या या यशाने शिरपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच विभागातील बसंती अनिल पावरा हिने विद्यापीठ गुणवत्ता यादीत पाचवा क्रमांक मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

तसेच महाविद्यालयाच्या संरक्षणशास्त्र विभागातील प्रतीक्षा दीपक लोहार हिने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक प्राप्त करून उल्लेखनीय यश मिळविले आहे. एकाच महाविद्यालयातील दोन विभागांच्या विद्यार्थिनींनी विद्यापीठ स्तरावर आपले नाव उंचावल्याने महाविद्यालयासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे.

विद्यार्थिनींच्या या यशामुळे इतर विद्यार्थिनींनाही शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणा मिळणार असून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अधिकाधिक यश मिळविण्याचा आत्मविश्वास निर्माण होणार आहे. महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे या यशातून अधोरेखित झाले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, संस्थेचे कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. गजानन पाटील, भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. एम. वाडीले, संरक्षणशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. के. बी. पाटील, प्रा. डॉ. इंदिरा गिरासे, प्रा. केशव तडवी, प्रा. अंकेश पावरा, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

वेतन श्रेणीचे प्रशिक्षण संपन्न

शहादा, दि.२३ (प्रतिनिधी)- शहादा व धडगाव तालुक्यातील १२ वर्षे व २४ वर्षे सेवा झालेले शिक्षकांच्या वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड वेतन श्रेणी दहा दिवसीय प्रशिक्षणाचा समारोप अनुसूचित जाती नवबौद्ध मुलांच्या निवासी शासकीय शाळा मोहिदा त.श येथे नंदुरबार जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता चंद्रकांत पवार तथा केंद्र समन्वयक शहादा व विस्तारधिकारी सचिन पाटील यांच्या उपस्थितीत समारोप कार्यक्रम पार पडला. यावेळी दि.१३ नोव्हेंबर ते दि.२२ नोव्हेंबर दहा दिवसांच्या प्रशिक्षण काळादरम्यान शहादा तालुका व धडगाव तालुक्यातील एकूण २७७ शिक्षकांनी एकाचवेळी प्रशिक्षण पूर्ण केले. यासाठी २४ शिक्षकांनी सुलभक म्हणून काम पाहिले. तसेच केंद्र समन्वयक व अधिव्याख्याता चंद्रकांत पवार डाएट नंदुरबार यांच्या हस्ते सुलभकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी माधवराव मोरे, मनोज खैरनार, हेमंत पाटील यांनी तांत्रिक सहाय्यक म्हणून कामकाज पाहिले.

पान १ वरुन

नवापूरला नगरोत्थान योजनेंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण

नगरसेवक धर्मेश पाटील, शिरीष प्रजापत, अल्तमस खाटीक, मनोहर गावित, सी.ए. वतन अग्रवाल, नाविद शहा,उमेश चव्हाण,सोमित्र गावीत,संगिता देसले,भाग्यश्री गावीत,उर्मिला गावीत,अनिता दुसाने,सविता नगराळे,राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुका अध्यक्ष दिलीप गावीत, माजी उपनगराध्यक्ष फारुक शहा,सामाजिक कार्यकरते अमृत लोहार,जैनु गावीत, जयेश जयस्वाल, माजी नगरसेवक आरिफ बलेसरीया, महेंद्र दुसाने, राजू आगळे, अविनाश वसावे, शहराध्यक्ष चित्रा चव्हाण, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इंद्रीस टिनवाला, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष तोसिफ स्टारवाला,सेफ व्होरा, साजीत शहा आदी उपस्थित होते. तसेच शितल सोसायटी परिसरातील राजू अग्रवाल, इरफान कुरेशी, किरीट शहा, संजय अग्रवाल, गौरव अग्रवाल, पुष्कर अग्रवाल, कृष्णा मावची, शुभम महाजन यांच्यासह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना ज्येष्ठ नेते भरतभाऊ गावित म्हणाले की, महात्मा गांधी पुतळा ते डायमंड हॉटेलपर्यंतचा रस्ता संपूर्ण काँक्रिटीकरण करण्यात येणार असून, त्यासाठी लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजित मोरे यांच्या प्रयतकातून हा निधी उपलब्ध झाला आहे. शहरातील विकासकामांसाठी मी स्वता व नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. नवापूर शहरातील रस्त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणण्यात आला असून, टप्प्याटप्प्याने संपूर्ण शहरातील रस्त्यांची कामे सुरू करण्यात येणार आहेत. नागरिकांनीही आपल्या परिसरातील रस्त्यांच्या कामांवर लक्ष ठेवून दर्जेदार काम करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. नगराध्यक्ष जयवंत जाधव म्हणाले की, नवापूर नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता आल्यानंतर शहरात विकासकामांना धडाकेबाज सुरुवात झाली आहे. प्रभाग क्रमांक मधील रस्ता, रेल्वे स्टेशनपर्यंतचा रस्ता तसेच सार्वजनिक गुजराथी हायस्कूलसमोरील रस्त्याचे काँक्रिटीकरण दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाले आहे. तत्कालीन पालकमंत्री कोकाटे, विद्यमान पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि भरतभाऊ गावित यांच्या प्रयतकातून शहरात विविध विकासकामे मार्गी लागत आहेत. येत्या काळात रस्ते, उद्याने आणि इतर मूलभूत सुविधांच्या विकासाला अधिक गती देण्यात येणार असून, शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा आमचा संकल्प आहे. यावेळी उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे यांनीही मनोगत व्यक्त केले. रस्त्याच्या कामाच्या शुभारंभामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, लवकरच या रस्त्याचे काम पूर्ण होऊन नागरिकांना चांगल्या दर्जाचा आणि टिकाऊ रस्ता उपलब्ध होणार आहे.

सागवान व साल लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, PVC फायबर दरवाजे, RCC सिमेंटचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण...



शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

पाहिजेत
कापड दुकानासाठी ३-सेल्समन पाहिजेत
-: समक्ष भेटा :-
सोना लेडीज वेअर
किड्सवेअर
पारोळा रोड, धुळे
(आकर्षक पगार)
9767544005

पाहिजे
दवाखान्यासाठी रिसेप्शनीस्ट पाहिजे.
दत्तमंदिर, देवपूर, धुळे.
-: संपर्क :-
9028413659

फ्लॅट भाड्याने देणे
2 BHK फ्लॅट सर्व सोयीयुक्त वास्तुप्रमाणे योग्य, अग्रवाल नगर, स्थित फ्लॅट भाड्याणे देणे आहे.
-: सपर्क :-
8275904971
9096043737

KSC KOTA SCIENCE CLASSES Your Dreams Our Mission
LEARN • GROW • ACHIEVE
PHYSICS for JEE / NEET / MHT-CET
Pushpendra Singh (Director and Teacher)
B.Tech. (EEE), ECK, Kota
Research Scholar, IIT Kanpur
Home Tuition Available
8766031261 | 8109195229 | Infront of Ganpati Mandir, Varshavadi, Mohadi, Dhule

पाहिजेत
मार्केटिंग प्रतिनिधी
पात्रता : कोणत्याही शाखेचा पदवीधर
सर्व्हिस इंजिनिअर
पात्रता : आय.टी.आय.
बॅक ऑफिस : फक्त महिला
संगणक ज्ञान व सोशल मीडिया हाताळणी
नवीन व अनुभवी उमेदवारांना संधी
क्रिएटिव्ह बिझनेस सिस्टिम्स
बायोडाटासह प्रत्यक्ष भेटा : संपर्क -
99235 97722 / 94227 70066

REQUIRED
A SOCIAL ORGANIZATION REQUIRES BOYS & GIRLS ATTRACTIVE SALARY. POSITIONS 2-2 EACH. CONTACT:-
8390997836

पाहिजे
श्री. छत्रपती हॉस्पिटल धुळे
वेदांत मंगल कार्यालय, देवपूर धुळे.
पूर्ण वेळ अनुभवी फिजीओथेरॅपीस्ट पाहिजे.
आर्कषक पगार
-: संपर्क :-
8788075246
9970520296

शेतजमीन विकत पाहिजे
धुळे तालुक्यात लोकवस्तीपासून ५०० मीटरपेक्षा लांब असलेली, पाण्याची सोय असलेली व रस्त्यालगत शेतजमीन विकत घेणे आहे.
-: संपर्क :-
९४२२०३२६१९

पाहिजेत
यश हॉस्पिटल, नगरपट्टी, धुळे इथे नर्सिंग कामासाठी स्टाफ पाहिजेत.
संपर्क करण्याची वेळ : दुपारी १२ ते संध्या ८.००
पत्ता : नगरपट्टी, सुभाष पुतळासमोर, धुळे

पाहिजे
श्री महालक्ष्मी व्हिसेस (सॅमसंग सर्व्हिस) येथे कॉम्प्युटर ऑपरेटर जागा त्वरीत भरणे आहे.
-: संपर्क :-
9822534352
पत्ता : १३७ जयहिंद कॉलनी, देवपूर, धुळे

गाळा विकणे आहे
अशोक इस्टेट (नहार कॉम्प्लेक्स) येथील ग्राऊंड फ्लोअर गाळा नं. 16, 210 Sq.Ft. त्वरीत विकणे आहे.
-: संपर्क :-.
9822534352
राजेश जोशी

पाहिजेत
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकौंटंट
२) सेल्समन बाहेर गावासाठी
३) मदतनीस मेडिकल होलसेल साठी
-: संपर्क :-
9823716975
9422287821

पाहिजेत
अन्न धान्य आडत दुकानात (ऑफिस) कामासाठी माणूस लावणे आहे.
समक्ष भेटा.
-: संपर्क :-
9403453061
9673942025

पाहिजेत
MIDC येथे फॅक्टरी कामासाठी कामगार, सुपरवायझर व Accountant पाहिजेत.
-: संपर्क :-
9130397130

पाहिजेत
ऑफिस/शोरूम कामासाठी मुले पाहिजेत. अनुभव असल्यास प्राधान्य
पात्रतेनुसार पगार.
ओम श्री इलेक्ट्रॉनिक्स
-: संपर्क :-
8484858402

पाहिजेत
FMCG Distributor मध्ये इंग्रजी वाचता लिहिता येणारे डिलिव्हरी बॉय, ड्रायव्हर, पाहिजेत.
(वय १८ ते २५)
पत्ता : अग्रसेन चौक जवळ,धुळे
M0.8379882544

पाहिजेत
१२ वी पास हुशार व होतकरू मुले लावणे आहेत
निखिल ट्रेडर्स
दु.नं.५, कॉटन मार्केट यार्ड, पारोळा रोड, धुळे.
9604090099
9623962235

गरम पाण्याचा एकच उपाय...
BAJAJ Crompton Racold USHA



गॅस गिझर
आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...
* अटी लागू.

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०